प्र.2 आ) दिलेल्या मुद्दयांच्या आधारे पुढीलपैकी कोणत्याही एका कवितेसंबंधी कृती पूर्ण करा.

**संतवाणी 1. अंकिला मी दास तुझा**

(1) प्रस्तुत कवितेचे कवी / कवयित्री ⟶ संत नामदेव

(2) कवितेचा रचनाप्रकार ⟶ अभंग

(3) कवितेचा काव्यसंग्रह ⟶ सकलसंतगाथा खंड पहिला ः श्री नामदेवमहाराजांची अभंगगाथा

(4) कवितेचा विषय ⟶ देवाने आई म्हणून आपला म्हणजेच भक्ताचा सांभाळ करावा.

(5) कवितेतून व्यक्त होणारा (स्थायी भाव) ⟶ आई म्हणून देवाने आपला सांभाळ करावा ही विनवणी भक्तीभावाने केली आहे.

(6) कवितेची मध्यवर्ती कल्पना ⟶ प्रसंगी आपल्या प्रणाची पर्वा न करता आई आपल्या मुलावर जशी माया करते त्याप्रमाणे देवाने ही अशीच माया माझ्यावर करावी अशी विनवणी संत नामदेवाने विठ्ठलाकडे केली आहे.

(7) कवितेतील आवडलेली ओळ ⟶ तैसा धांवे माझिया काजा | अंकिला मी दास तुझा ||

(8) कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे ⟶ संत नामदेवाने विठ्ठलाला आई म्हटले आहे त्यामुळे आई जसे आपल्या मुलावर प्रेम करते त्याप्रमाणे विठ्ठलानेही आपल्यावर माया करावी यावरून आईची महती कळते म्हणून हा अभंग मला खूप आवडला.

## संतवाणी 2 योगी सर्वकाळ सुखदाता

(1) प्रस्तुत कवितेचे कवी ⟶ संत एकनाथ

(2) कवितेचा रचनाप्रकार ⟶ अभंग

(3) कवितेचा काव्यसंग्रह ⟶ एकनाथी भागवत

(4) कवितेचा विषय ⟶ योगी पुरूष हा पाण्यापेक्षाही श्रेष्ठ हे उदा. देवून स्पष्ट केले आहे.

(5) कवितेतून व्यक्त होणारा (स्थायी भाव ) ⟶ योगी पुरूष हा समाजाचा उद्धार करण्यासाठीच जन्माला आलेला असतो.

(6) कवितेची मध्यवर्ती कल्पना ⟶ योगी पुरूषाच्या बोलण्याने , त्याचे बोल ऐकण्याने त्याच्या सहवासाने लोकांची मने समाधानी होतात म्हणून योगी पुरूष हा पाण्यापेक्षाही श्रेष्ठ आहे.

(7) कवितेतील आवडलेली ओळ ⟶ जन निववी श्रवणकीर्तनें | निजज्ञानें उद्धरी ||

(8) कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे ⟶ संत एकनाथ महाराजांनी योगी पुरूषाची महती गाताना अनेक दाखले दिले आहेत. पाण्याच्या सेवाभावापेक्षा योगी पुरूषाचा सेवाभाव हा श्रेष्ठ दर्जाचा असतो म्हणून हा अभंग मला खूप आवडला.

## 5 . दोन दिवस

(1) प्रस्तुत कवितेचे कवी ⟶ नारायण सुर्वे

(2) कवितेचा रचनाप्रकार ⟶ जीवनाचे वास्तववादी चित्रण

(3) कवितेचा काव्यसंग्रह ⟶ ऐसा गा मी ब्रहम !

(4) कवितेचा विषय ⟶ जगण्यासाठी करावी लागणारी धडपड याचे भीषण चित्रण रेखाटले आहे .

(5) कवितेतून व्यक्त होणारा (स्थायी भाव ) ⟶ जगाच्या शाळेत दुःख पचवून जगण्याची शिकवण आपल्याला अनुभव देते .

(6) कवितेची मध्यवर्ती कल्पना ⟶ पोटाची भूक भागविण्यासाठी अश्रूंची साथ घेत जीवनाचे भीषण चित्रण रेखाटले आहे .

(7) कवितेतील आवडलेली ओळ ⟶ दुनियेचा विचार हरघडी केला, अगा जगमय झालो

(8) कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे ⟶ कामगारांचे जीवन कष्टमय असते . गरीबी ही त्यांच्या वाटयाला आलेली असते . आयुष्य पोटापाण्याच्या विवंचनेत जाते . अशा कामगारांच्या व्यथांचे भयाण वास्तव रेखाटले आहे . म्हणून ही कविता मला खूप आवडली .

## ९. औक्षण

(1) प्रस्तुत कवितेचे कवी ⟶ इंदिरा संत

(2) कवितेचा रचनाप्रकार ⟶ सैनिकाच्या शौर्यावर देशभक्तीपर गीतरचना

(3) कवितेचा काव्यसंग्रह ⟶ इंदिरा संत यांची समग्र कविता

(4) कवितेचा विषय ⟶ देशाच्या उज्जवल भविष्य कसे करता येईल हा भाव आहे.

(5) कवितेतून व्यक्त होणारा (स्थायी भाव ) ⟶ गोरगरीब माणसांच्या मनात जवानाविषयी दाटून आलेल्या भावनांचे दर्शन ह्दयस्पर्शी शब्दांत केल्या आहेत.

(6) कवितेची मध्यवर्ती कल्पना ⟶ देशासाठी सैनिक आपल्या प्राणांची पर्वा न करता लढतो. सैनिकाच्या शौर्यावर असणारी असीम श्रद्धा व प्रेम याचे दर्शन या कवितेत चित्रित केले आहे.

(7) कवितेतील आवडलेली ओळ ⟶ अशा असंख्य ज्योतींची तुझ्यामागून राखण.

(8) कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे ⟶ या कवितेत सैनिकांविषयी असणारी कृतज्ञता व्यक्त केली आहे. सैनिक सीमेवर जीवाची बाजी लावून लढतात त्यामुळे आपण सुरक्षित आहोत त्यांच्या कार्याची महती अवर्णनीय आहे त्यामुळे ही कविता मला फार आवडली.

## 12 . रंग मजेचे रंग उदयाचे

(1) प्रस्तुत कवितेचे कवी → अंजली कुलकर्णी

(2) कवितेचा रचनाप्रकार → निसर्ग सौंदर्य व पर्यावरणाची जोपासना

(3) कवितेचा काव्यसंग्रह → रात्र , दुःख आणि कविता

(4) कवितेचा विषय → निसर्ग आपला अन्नदाता असून आपले संबंध हे मातीशीच निगडीत आहेत .

(5) कवितेतून व्यक्त होणारा (स्थायी भाव ) → कृषिसंस्कृती ,श्रमप्रतिष्ठा पर्यावरणाची जोपासना , मातीशी घट\ट नाते .

(6) कवितेची मध्यवर्ती कल्पना → जागतिकीकरण युगात संगणक युग अवतरले तरी माणसाचे नाते या मातीशी निगडीत आहे निसर्गातच आपल्याला खराखुरा आनंद मिळणार आहे .

(7) कवितेतील आवडलेली ओळ → धान्य देईना संगणक हा , काळी आई जगवू

मातीमध्ये जे हात राबती , तयांस देऊ पुष्टी ......

रंग मजेचे रंग उदयाचे ............ .

(8) कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे → आपल्याला जगण्यासाठी मिळणा-या गोष्टी या निसर्गातूनच मिळतात . आपण जर निसर्गाची जोपासना नीट केली तर आपले सगळयांचे भविष्य हे उज्जवल आहे .

## 13 . हिरवंगार झाडासारखं

1) प्रस्तुत कवितेचे कवी ⟶ जॉर्ज लोपीस

(2) कवितेचा रचनाप्रकार ⟶ निसर्ग कविता , झाडांप्रति गीतरचना

(3) कवितेचा काव्यसंग्रह ⟶ पूर्ण झाले आहे .

(4) कवितेचा विषय ⟶ झाडांसारखे चांगले गुण अंगिकारायला हवेत .

(5) कवितेतून व्यक्त होणारा (स्थायी भाव ) ⟶ सहनशीलता , दातृत्व , सहकार्य ,कठीण प्रसंगी डगमगून न जाता सामना करणे ,आनंदीवृत्ती . या मुल्यांच्या तत्वामुळे शांतरस प्रत्ययाला येतो .

(6) कवितेची मध्यवर्ती कल्पना ⟶ आनंदी जीवन जगण्यासाठी झाडांसारखे सर्व गुण आपल्या अंगी बाणवावेत . झाडांसारखे प्रफुल्लित राहावे , हा विचार सांगितला आहे .

(7) कवितेतील आवडलेली ओळ ⟶ जगावं कसंतर ? हिरवंगार झाडासारखं

रोजच चिंतन करावं, कसं तर हिरवंगार झाडासारखं!

(8) कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे ⟶ या कवितेत कविने झाडासारखं गुण अंगी बाळगून दुस-याला आनंद दिला पाहिजे . नेहमी आनंदी राहायला पाहिजे .

## 16 . स्वप्न करू साकार

(1) प्रस्तुत कवितेचे कवी ⟶ किशोर पाठक

(2) कवितेचा रचनाप्रकार ⟶ देशभक्तीपर गीतरचना

(3) कवितेचा काव्यसंग्रह ⟶ पालव , निरूपण

(4) कवितेचा विषय ⟶ देशाच्या उज्जवल भविष्य कसे करता येईल हा भाव आहे .

(5) कवितेतून व्यक्त होणारा (स्थायी भाव ) ⟶ कृषिसंस्कृती , श्रमप्रतिष्ठा , एकजुटीचे सामर्थ्य ही मूल्ये जोपासली आहेत .

(6) कवितेची मध्यवर्ती कल्पना ⟶ कृषिसंस्कृती , श्रमप्रतिष्ठा , एकजुटीचे सामर्थ्य ही मूल्ये सांगून देशाचे स्वप्न कसे साकार करता येईल हे विशद केले आहे .

(7) कवितेतील आवडलेली ओळ ⟶ हस्त शुभंकर हवा एकदा
भविष्य उज्जवल या देशाचे करूया जयजयकार

(8) कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे ⟶ या कवितेत कविने नवीन युगाचे स्वप्न साकार करण्यासाठी श्रमाबरोबर एकात्मताही असेल तर आपल्या देशाचे भविष्य हे उज्जवल होईल व आपली स्वप्ने साकार होतील हा विचार खूप आवडला .

## 16 . स्वप्न करू साकार

(1) प्रस्तुत कवितेचे कवी ⟶ किशोर पाठक

(2) कवितेचा रचनाप्रकार ⟶ देशभक्तीपर गीतरचना

(3) कवितेचा काव्यसंग्रह ⟶ पालव , निरूपण

(4) कवितेचा विषय ⟶ देशाच्या उज्जवल भविष्य कसे करता येईल हा भाव आहे .

(5) कवितेतून व्यक्त होणारा (स्थायी भाव ) ⟶ कृषिसंस्कृती , श्रमप्रतिष्ठा , एकजुटीचे सामर्थ्य ही मूल्ये जोपासली आहेत .

(6) कवितेची मध्यवर्ती कल्पना ⟶ कृषिसंस्कृती , श्रमप्रतिष्ठा , एकजुटीचे सामर्थ्य ही मूल्ये सांगून देशाचे स्वप्न कसे साकार करता येईल हे विशद केले आहे .

(7) कवितेतील आवडलेली ओळ ⟶ हस्त शुभंकर हवा एकदा
भविष्य उज्जवल या देशाचे करूया जयजयकार

(8) कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे ⟶ या कवितेत कविने नवीन युगाचे स्वप्न साकार करण्यासाठी श्रमाबरोबर एकात्मताही असेल तर आपल्या देशाचे भविष्य हे उज्जवल होईल व आपली स्वप्ने साकार होतील हा विचार खूप आवडला .